# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
**Maharashtra State Board of Secondary and Higher Secondary Education**

नागपूर विभागीय मंडळ,सिव्हिल लाईन्स,नागपूर–440 001

दूरध्वनी क्रमांक:0712–2565403 / 2560209 / 2553401,फॅक्स क्र :0712–2561775


पत्र क्रमांक/उ.मा. प्रात्य/ 1862
नागपूर दिनांक 28/ 06 /2018

प्रति,

प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ,
महाविद्यालय, नागपूर विभागीय,
मंडळ, नागपूर

**विषय** :- उच्च माध्यमिक प्रात्यक्षिक परीक्षा फेब्रुवारी/मार्च-2019 करीता शिक्षकांची माहिती पाठविणेबाबत.

नागपूर विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालयांच्या प्राचार्यांना वरील विषयास अनुसरून कळविण्यात येत आहे की, फेब्रुवारी/मार्च- 2019 च्या उच्च माध्यमिक प्रात्यक्षिक परीक्षेकरीता खाली दर्शविलेले विषय शिकविणा-या शिक्षकांची माहिती सेवा जेष्ठतेनुसार सोबत दिलेल्या पॅनल फॉर्ममध्ये भरून दिनांक 31/07/2018 पर्यंत हस्तपोच किंवा पोस्टाद्वारे मंडळ कार्यालयात पाठविण्यात यावी. जेणे करून फेब्रुवारी/मार्च- 2019 च्या प्रात्यक्षिक परीक्षेकरीता अंतर्गत व बहिर्गत परीक्षकांची नेमणुक करण्यात अडचण निर्माण होणार नाही, जर एक शिक्षक एकापेक्षा जास्त विषय शिकवत असेल तर प्रत्येक विषयाकरिता वेगवेगळया रकान्यामध्ये स्वतंत्रपणे पॅनल फॉर्ममध्ये माहिती देण्यात यावी. कनिष्ठ महाविद्यालयामध्ये कार्यरत संबधित विषयाचे अध्यापन करणा-या सर्वच शिक्षकांची नावे समाविष्ठ करणे अनिवार्य आहे. कनिष्ठ महाविद्यालयाच्या वर्गात अध्यापन करणा-या एकाही शिक्षकाचे नाव आपण दिलेल्या माहिती मधून सुटणार नाही याची दक्षता घ्यावी. एखादया शिक्षकाचे नाव यादी मधून सुटल्यास व त्याबाबत तक्रारी प्राप्त झाल्यास याबाबत होणा-या परिणामाची सर्वस्वी जबाबदारी आपली स्वत:ची राहील याची नोंद घ्यावी. दिलेली माहिती अचूक व वस्तुनिष्ठ असावी.

**विषय** :- (1) पर्यावरण ( 31 ) ( 2) गणित व संख्याशास्त्र (40) (3) भौतिकशास्त्र (54)
(4) रसायनशास्त्र (55 ) (5) जीवशास्त्र (56) (6) माहितीतंत्रज्ञान ( 97,98,99 )
(7) द्विलक्षी अभ्यासक्रम (A1 To D9) (8) उच्च माध्यमिक व्यावसायिक अभ्यासक्रम ( पुर्णवेळ शिक्षक प्रात्यक्षिक EABC TO XABC )

( रविकांत देशपांडे )
विभागीय सचिव,
नागपूर विभागीय मंडळ, नागपूर

**प्रतिलिपी** – 1) विभागीय शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर
2) शिक्षणाधिकारी माध्यमिक, भंडारा, चंद्रपूर, नागपूर, वर्धा, गडचिरोली, गोंदिया